# राज्य माहिती अधिकार अधिनियम २००५ अनव्ये अर्जाचा नमुना

**Format of Application for obtaining Information under the right to Information Act. 2005**

**अर्जाचा नमुना**

**Application Form**

10रु. कोर्ट फी Rs.10 COURT FEE भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

प्रति,

मा. नगरसचिव, सचिव विभाग
The मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.भा./न.पा./जा.प.
आवक क्र.: 03
दिनांक:- 09/02/2023

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव
Full Name of Application श्री निलेश सुधाकर मुणगेकर

२) अर्जदाराचा पुर्ण पत्ता B/003 कांती पॅराडाईज आरएनपी पार्क,
Address ओसवाल बागेच्या जवळ भाईंदर पूर्व ४०११०५

३) माहितीचा विषय स्थायी व अधिकारी कर्मचारी यांना गोपनीय दिनवणी देण्यात
Subject Of Information आलेल्या प्रशासन बाबतचे सर्व ठराव

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल स्थायी लिपिक, वरिष्ठ लिपिक, शाखा अभियंता
Particulars of Information require तसेच अधिकारी प्रशासकीय अधिकारी सहायक आयुक्त
आणि कर्मचारी व अधिकारी यांना देण्यात आलेल्या परीक्षा तसेच
बाबतचे सर्व ठराव प्रतसहित

माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधिः
She Period which the information relates सन 2020 ते आजपर्यंत
माहिती टपालाने अथावा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे स्वतः
Formation is required by Post or In person
(उदा शुल्कमध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल)
Atual Postal charges shall be included in additional fees

टपालाने हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे
द्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने)
**Passé by post**
**Dinary, Registered of Speed)**

Signature of Applicant
निलेश सुधाकर मुणगेकर
8898235534

OK

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./03 /2022-23 दिनांक :- 09 / 2 /2023

प्रति,
**श्री. नितेश सुधाकर मुणगेकर,**
**बी / 003, कांती पॅराडाईस,**
**आर.एन.पी. पार्क,**
**ओस्तवाल बगीचा जवळ,**
**भाईंदर (पू.)**

**विषय :-** **<u>कैंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.</u>**
**शिपाई ते अधिकारी वर्ग यांना गेल्या दोन वर्षात देण्यांत आलेल्या प्रमोशन बाबतचे सर्व ठराव.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 30/01/2023 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण शिपाई ते अधिकारी वर्ग यांना गेल्या दोन वर्षात देण्यांत आलेल्या प्रमोशन बाबतचे सर्व ठरावांच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 03/08/2022 ठराव क्र. 28, मा. महासभा दि. 03/08/2022 ठराव क्र. 38, प्रशासकिय ठराव क्र. 26 दि. 21/09/2022, प्रशासकिय ठराव क्र. 36 दि. 28/09/2022, प्रशासकिय ठराव क्र. 65 दि. 13/10/2022 या ठरावांच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देत आहोत.

उक्त माहितीकरिता लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 16 पानांकरिता रुपये 32/- (अक्षरी रुपये बत्तीस मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी**
**सचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०३/०८/२०२२

प्रकरण क्र.24 :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उपमुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उपमुख्य उद्यान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ) शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब), अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब), या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. २८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नेमणूक करणे व पदोन्नती देण्याचा अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये महापालिकेमध्ये निहित आहे.

महापालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देताना कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून तसेच चौकशीच्या निर्णयाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपाची पदोन्नती देण्यात आलेली आहे. प्रशासनाने पदोन्नती दिलेल्या काही अधिकारी / कर्मचाऱ्यांबाबत कोर्टात प्रकरणे प्रलंबित आहेत व काहींची चौकशी सुरु असुन निर्णय प्रलंबित आहे. पदोन्नती देताना काही अधिकारी / कर्मचारी यांना वंचित ठेवलेले आहे. मा. महासभेपूढे पदोन्नतीचा गोषवारा सादर करताना पात्र / अपात्र अधिकारी / कर्मचारी यांची सविस्तर माहिती सादर केलेली नाही. निवड समितीने पदोन्नतीबाबत घेतलेला निर्णयाची पूर्ण माहिती सभागृहाला दिलेली नाही. प्रशासनाने गोषवाऱ्यात परिपूर्ण माहिती सादर न केल्याने पदोन्नतीचा प्रस्ताव मंजुर केल्यास काही अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पदोन्नतीकरीता मा. महासभेची मंजुरी न घेता विविध अधिकाऱ्यांना परस्पर पदोन्नती दिलेली आहे ती नियमबाह्य आहे. पदोन्नतीस मंजुरी देणेस संयुक्तीक ठरणार नाही तसेच कोणत्याही अधिकारी / कर्मचाऱ्यांवर अन्याय होवू नये व पदोन्नतीस मंजुरी देताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (1) चे उल्लंघन झालेले आहे त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे. प्रशासनाने सविस्तर माहितीसह सदरचा प्रस्ताव पुढील मा. महासभेत सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- (डिम्पल मेहता) अनुमोदन :- (Hetal Parmar)

ठराव ~~बहुमताने~~ / सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०३/०८/२०२२

**प्रकरण क्र.35 :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ) माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत..**

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नेमणूक करणे व पदोन्नती देण्याचा अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये महापालिकेमध्ये निहित आहे.

महापालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देताना कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून तसेच चौकशीच्या निर्णयाच्या अधीन राहून तात्पुरत्य: स्वरुपाची पदोन्नती देण्यात आलेली आहे. प्रशासनाने पदोन्नती दिलेल्या काही अधिकारी / कर्मचाऱ्यांबाबत कोर्टात प्रकरणे प्रलंबित आहेत व काहींची चौकशी सुरु असुन निर्णय प्रलंबित आहे. पदोन्नती देताना काही अधिकारी / कर्मचारी यांना वंचित ठेवलेले आहे. मा. महासभेपूढे पदोन्नतीचा गोषवारा सादर करताना पात्र / अपात्र अधिकारी / कर्मचारी यांची सविस्तर माहिती सादर केलेली नाही. निवड समितीने पदोन्नतीबाबत घेतलेला निर्णयाची पूर्ण माहिती सभागृहाला दिलेली नाही. प्रशासनाने गोषवाऱ्यात परिपूर्ण माहिती सादर न केल्याने पदोन्नतीचा प्रस्ताव मंजुर केल्यास काही अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पदोन्नतीकरीता मा. महासभेची मंजुरी न घेता विविध अधिकाऱ्यांना परस्पर पदोन्नती दिलेली आहे ती नियमबाह्य आहे. पदोन्नतीस मंजुरी देणेस संयुक्तीक ठरणार नाही तसेच कोणत्याही अधिकारी / कर्मचाऱ्यांवर अन्याय होवू नये व पदोन्नतीस मंजुरी देताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (1) चे उल्लंघन झालेले आहे त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे. प्रशासनाने सविस्तर माहितीसह सदरचा प्रस्ताव पुढील मा. महासभेत सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** (सही) मा. रिटा सुभाष

**अनुमोदन :-** Hema R Belani (Hema Rajesh Belani) (हेमा बेलानी)

**ठराव ~~बहुमताने~~ / सर्वानुमते मंजुर**

(सही)

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

(सही)

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा

### प्रशासकीय ठराव दि. २१/०८/2022 रोजी दुपारी 01.30 वाजता

मिरा - भाईंदर महानगरपालिका ③

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

## कार्यालयीन प्रस्ताव

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| सहायक अधिसेविका श्रेणी - 02 निमवैद्यकीय सेवा) | सरळसेवा/ नामनिर्देशन 50% | अ-1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (नर्सिंग) विषयाची पदवी.<br>अ-2) परिसेविका या पदावरील शासकीय/ निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी रुग्णालयातील संबंधीत विषयातील किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>अ-3) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>अ-4) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>किंवा<br>ब-1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>ब-2) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका<br>ब-3) सिस्टर इन चार्ज/नाईट सुपरवायझर (परिसेविका) |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| | | म्हणून शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबंधीत विषयातील किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ब-4) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| | पदोन्नती 50% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत परिसेविका (सिस्टर इन चार्ज/नाईट सुपरवायझर) पदाचा किमान 05 वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (श्रेणी - 02, सार्वजनिक आरोग्य सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता अधिकारी या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| उप-मुख्य उदयान अधिक्षक (श्रेणी - 02, उदयान सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उदयान अधीक्षक या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (श्रेणी - 01, अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| शाखा अभियंता (स्थापत्य) (श्रेणी - 02, अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कनिष्ठ अभियंता व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| अग्निशमन केंद्र अधिकारी (श्रेणी - 02. अग्निशमन सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान 03 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार सहायक अधिसेविका - 01 पद, उप-मुख्य स्वच्छता अधिकारी -02 पदे, उप-मुख्य उदयान अधिक्षक -02 पदे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) - 03 पदे, शाखा अभियंता (स्थपत्य) - 16 पदे व अग्निशमन केंद्र अधिकारी - 08 पदे ही पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.3 (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22.07.2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब) , कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अग्निशमन केंद्र अधिकारी या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.22/12/2021, दि.09/02/2022, दि.09/03/2022 व दि.31/03/2022 रोजी आयोजित करण्यात आली होती.

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्रीम. स्वाती आ. राणे<br>S-14 38600-122600 | परिसेविका | सहाय्यक अधिसेविका | खुला | S-15 41800-132300 |
| 2. | श्री.राजकुमार कांबळे<br>S-14 38600-122800 | स्वच्छता अधिकारी | उप मुख्य स्वच्छता अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 3. | श्री.संदिप चंद्रकांत शिंदे<br>S-14 38600-122800 | | | | |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली ... सत्यप्रत

... अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4. | श्री. नागेश विरकर<br>S-13 35400-112400 | उदयान अधिक्षक | उप मुख्य उदयान अधिक्षक | खुला | S-15 41800-132300 |
| 5. | श्री. हंसराज मेश्राम<br>S-13 35400-112400 | | | | |
| 6. | श्री. किरण राठोड<br>S-20 56100-177500 | उप-अभियंता (स्थापत्य) | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | खुला | S-23 67700-208700 |
| 7. | श्री. शरद नानेगांवकर<br>S-20 56100-177500 | | | | |
| 8. | श्री.शिरीषकुमार पवार<br>S-13 35400-112400 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | शाखा अभियंता (स्थापत्य) | खुला | S-15 41800-132300 |
| 9. | श्रीम.प्रांजल शैलेश कदम<br>S-13 35400-112400 | | | | |
| 10. | श्री.सतिश जे.तांडेल<br>S-13 35400-112400 | | | | |
| 11. | श्री.राजेंद बा.पांगळ<br>S-13 35400-112400 | | | | |
| 12. | श्री.अरविंद ह. पाटील<br>S-13 35400-112400 | | | | |
| 13. | श्री.भुपेश द.काकडे<br>S-13 35400-112400 | | | | |
| 14. | श्री.उत्तम य. रणदिवे<br>S-13 35400-112400 | | | | |
| 15. | श्री.उमेश अवचर (अपंग)<br>S-13 35400-112400 | | | | |
| 16. | श्री.सचिन ना.पाटील<br>S-13 35400-112400 | | | | |
| 17. | श्री.यतिन व. जाधव<br>S-13 35400-112400 | | | | |
| 18. | श्री.दिलीप रणवरे<br>S-13 35400-112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 19. | श्री.धनंजय वसंत कनोजे<br>S-13 35400-112400 | | | | |
| 20. | श्री.प्रकाश शंकर बोराडे<br>S-13 35400-112400 | | | | |

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) गट-अ, शाखा अभियंता (स्थापत्य) व अग्निशमन केंद्र अधिकारी संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

त्यामुळे सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार वर्ग-01 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ) व मा. विभागीय समितीने मान्यता दिल्यानुसार उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा. महासभेची मंजुरी मिळणेकरिता गोषवारा मा. महासभेपुढे सादर करण्यात आलेला होता.

मा.महासभा दि.03/08/2022 ठराव क्र.28 अन्वये पदोन्नतीकरीता मा.महासभेची मंजुरी न घेता विविध अधिकाऱ्यांना परस्पर पदोन्नती दिलेली आहे ती नियमबाहय आहे. पदोन्नतीस मंजुरी देणेस संयुक्तीक ठरणार नाही तसेच कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अन्याय होवु नये व पदोन्नतीस मंजुरी देताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (1) चे उल्लंघन झालेले आहे त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे. प्रशासनाने सविस्तर माहितीसह सदरचा प्रस्ताव पुढील मा. महासभेत सादर करावा असा ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

मा.महासभा दि.03/08/2022 रोजीच्या पारीत झालेल्या ठराव क्र.28 मधील नमुद बाबी विचारात घेता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

अधिकारी/कर्मचारी यांना महानगरपालिका आकृतीबंध, महानगरपालिका सेवा प्रवेश नियम, अधिकारी/कर्मचारी यांचा सेवा ज्येष्ठता, पदोन्नती देण्यासंदर्भात शासनाचे शासन निर्णय/परिपत्रक, मा.न्यायालयाने पदोन्नती संदर्भात दिलेले निर्णय इत्यादी सर्व बाबींचा विचार करुन नियमानुसार पात्र अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती दिलेली आहे. पदोन्नती देताना कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचेवर अन्याय झालेला नाही व दिलेली पदोन्नती नियमानुसार असल्यामुळे नियमांचे उल्लंघन झालेले नाही.

वरील अधिकारी/कर्मचारी यांना नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर,2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करुन मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी/कर्मचारी यांना दिलेल्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.महासभा मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रत ही सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

तरी सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मा. प्रशासक यांची मंजुरी मिळवी, असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासमार्फत सादर करण्यात आलेला आहे.

## सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. २६ दिनांक. २९/८/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाही करीता सादर.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली सत्यप्रत
जन माहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दि. २८/ ०९ /2022 रोजी दुपारी 03.30 वाजता

प्रकरण) क्रमांक :- 30 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

## कार्यालयीन प्रस्ताव

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता शैक्षणिक अर्हता व पात्रता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (श्रेणी - 01 अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| शाखा अभियंता (स्थापत्य) (श्रेणी - 02 अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कनिष्ठ अभियंता व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| सहायक आयुक्त (श्रेणी-2, प्रशासकीय सेवा) | पदोन्नती 50% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार कार्यकारी अभियंता (स्थापत्य) -02 पदे, शाखा अभियंता (स्थापत्य) - 06 पदे व सहा. आयुक्त - 04 पदे ही पदोन्नतीने भरावयाची आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.3 (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.01/08/2022 व दि.10/08/2022 रोजी आयोजित करण्यात आली होती.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तींच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली ... सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. नितीन मुकणे<br>S-20 56100-177500 | उप-अभियंता (स्थापत्य) | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | खुला | S-23 67700-208700 |
| 2. | श्री.चेतन म्हात्रे<br>S-15 41800-132300 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | शाखा अभियंता (स्थापत्य) | खुला | S-13 35400-112400 |
| 3. | श्री.सुदाम गोडसे<br>S-15 41800-132300 | प्रशासकीय अधिकारी | सहा. आयुक्त | खुला | S-16 44900-142400 |

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

त्यामुळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 नुसार शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे सहा. आयुक्त (गट-ब) या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणे आवश्यक आहे.

सबब वरील अधिकारी/कर्मचारी यांना नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर,2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करुन मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्या वेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

त्याअनुषंगाने वरील अधिकारी/कर्मचारी यांना दिलेल्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.महासभा मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

तरी सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मा. प्रशासक यांची मंजुरी मिळवी, असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासमार्फत सादर करण्यात आलेला आहे.

## सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र.३६ दिनांक.२८/९/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व सहा. आयुक्त (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाही करीता सादर.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\पदोन्नती 2021 पदोन्नती प्रस्ताव प्रशासक ठराव.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा

### प्रशासकीय ठराव दि. १३ / १० /2022 रोजी दुपारी ३.०० वाजता

६६

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

## कार्यालयीन प्रस्ताव

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| अतिरिक्त शहर अभियंता (श्रेणी - 01 अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता या पदावर किमान 03 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापिठाची अभियांत्रिकी पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| माता व बाल कल्याण अधिकारी (श्रेणी - 01, वैद्यकीय सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी/अपघात वैद्यकीय अधिकारी पदाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणाऱ्या व पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या (M.D) अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| सिस्टिम ॲनालिस्ट (श्रेणी - 02, तांत्रिक सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर)/संगणक प्रोग्रामर या पदावर किमान 03 वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
माहिती अधिकारी
सचिव विभाग
महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार अतिरिक्त शहर अभियंता - 01 पद, माता व बाल कल्याण अधिकारी -01 पद, व सिस्टिम ॲनालिस्ट -01 पद पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.उ (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. असे निर्देश आहेत.

अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.30/05/2022, दि.31/03/2022, व दि.07/07/2022 रोजी आयोजित करण्यात आली होती.

अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. सुरेश वाकोडे<br>S-23 67700-208700 | कार्यकारी अभियंता | अतिरिक्त शहर अभियंता | खुला | S-25 78800-209200 |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | डॉ. प्रमोद पडवळ<br>S-20 56100-177500 | वैद्यकीय अधिकारी | माता व बाल कल्याण अधिकारी | खुला | S-23 67700-208700 |
| 3. | श्रीम. मनस्वी मंगेश म्हात्रे<br>S-13 35400-112400 | संगणक प्रोगामर | सिस्टिम ॲनालिस्ट | खुला | S-15 41800-132300 |

अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

त्यामुळे अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार वर्ग-01 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ) व माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा. महासभेची मंजुरी मिळणेकरिता गोषवारा मा. महासभेपुढे सादर करण्यात आलेला होता.

मा.महासभा दि.03/08/2022. ठराव क्र.38 अन्वये पदोन्नतीकरीता मा.महासभेची मंजुरी न घेता विविध अधिकाऱ्यांना परस्पर पदोन्नती दिलेली आहे ती नियमबाहय आहे. पदोन्नतीस मंजुरी देणेस संयुक्तीक ठरणार नाही तसेच कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अन्याय होवु नये व पदोन्नतीस मंजुरी देताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (1) चे उल्लंघन झालेले आहे त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे. प्रशासनाने सविस्तर माहितीसह सदरचा प्रस्ताव पुढील मा. महासभेत सादर करावा असा ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

मा.महासभा दि.03/08/2022 रोजीच्या पारीत झालेल्या ठराव क्र.38 मधील नमुद बाबी विचारात घेता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

अधिकारी/कर्मचारी यांना महानगरपालिका आकृतीबंध, महानगरपालिका सेवा प्रवेश नियम, अधिकारी/कर्मचारी यांची सेवा जेष्ठता, पदोन्नती देण्यासंदर्भात शासनाचे शासन निर्णय/परिपत्रक, मा.न्यायालयाने पदोन्नती संदर्भात दिलेले निर्णय इत्यादी सर्व बाबींचा विचार करुन नियमानुसार पात्र अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती दिलेली आहे. पदोन्नती देताना कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचेवर अन्याय झालेला नाही व दिलेली पदोन्नती नियमानुसार असल्यामुळे नियमाचे उल्लंघन झालेले नाही.

सबब वरील अधिकारी/कर्मचारी यांना नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागाकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28. दि.25 नोव्हेंबर,2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी/कर्मचारी यांना दिलेल्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.महासभा मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

तरी सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेकरीता मा. प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजुरी मिळवी, असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासमार्फत सादर करण्यात आलेला आहे.

## सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. ६५ दिनांक. ३३/१०/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता (गट-अ), माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ), व सिस्टिम ॲनालिस्ट (गट-ब) या या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाही करीता सादर.